| MHJN100003872025 | दाखल दिनांक : २६/०३/२०२५<br>नोंदणी दिनांक : २६/०३/२०२५<br>निकाल दिनांक : **२५/०५/२०२६**<br>कालावधी : **०१ वर्ष, ०१ म.,३० दि.** |
|---|---|

**भाग – अ**

**मंठा येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.०१ ) यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी – **श्रीमती एल. पी. धन्वे,** प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी)

**नि.क्र. ५९**

नि. फौ. ख. क्र. ६०/२०२५

(गुन्हा क्र. ५९५/२०२४ **मंठा** पोलिस स्टेशन)

**फिर्यादी –** **महाराष्ट्र सरकार तर्फे**
पोलीस ठाणे अधिकारी **मंठा,**
ता. मंठा जि. जालना.

**सरकारतर्फे विधिज्ञ –** श्री. एल.आर. पांचाळ, सहा. सरकारी अभियोक्ता.

**– विरुध्द –**

**आरोपी –**

१) **नंदकुमार देविदास राठोड,**
वय ४३ वर्ष,

२) **कुंडलिक देविदास राठोड,**
वय ३९ वर्षे,

३) **छम्या उर्फ संजय पंडीत राठोड,**
वय ३८ वर्ष,

४) **राजेश ज्ञानेश्वर राठोड,**
वय ३३ वर्ष,

५) **प्रविण ज्ञानेश्वर राठोड,**
वय २४ वर्ष,

६) **उषा नंदकुमार राठोड,**
वय ३९ वर्ष,

७) **किरण पि. नंदकुमार राठोड उर्फ किरण भ्र. कृष्णा चव्हाण,**
वय २० वर्ष,
सर्व आरोपी रा. गुळखंड तांडा, ता. मंठा, जि. जालना

८) **पिनु उर्फ माउली ज्ञानेश्वर प्रकाश जाधव,**
वय ३५ वर्ष,
रा. दहिफळ खंदारे, ता. मंठा, जि. जालना

९) **सुनिल प्रल्हाद राठोड,**
वय २८ वर्ष,
रा. जाटखेडा, ता. मंठा, जि. जालना

**आरोपींतर्फे विधीज्ञ** – श्री.एस.बी. म्हस्के,

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०१/१२/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | ०२/१२/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | २४/०२/२०२५ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०१/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०६/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | **२५/०५/२०२६** |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | दोषी/ निर्दोष | शिक्षा | भा.ना.सु.सं. चे कलम ४६८ च्या उद्देशाकरीता आरोपी खटल्या दरम्यान तुरुंगामध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **नंदकुमार देविदास राठोड** | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| २. | **कुंडलिक देविदास राठोड** | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| ३. | **छम्या उर्फ संजय पंडीत राठोड** | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| ४. | **राजेश ज्ञानेश्वर राठोड** | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाणे नोटीस | | ३५१(२), ३५१(३), अन्वये | | | |
| ५. | प्रविण ज्ञानेश्वर राठोड | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९ (२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ६. | उषा नंदकुमार राठोड | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९ (२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ७. | किरण पि. नंदकुमार राठोड उर्फ किरण भ्र. कृष्णा चव्हाण | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९ (२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ८. | पिनु उर्फ माऊली ज्ञानेश्वर प्रकाश जाधव | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९ (२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ९. | सुनिल प्रल्हाद राठोड | बी.एन.एस एस. चे कलम ३(५) प्रमाणे नोटीस | निरंक | भारतीय न्याय संहिताचे कलम १८९ (२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## <u>भाग – क</u>

सरकार/बचावपक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी –

अ. सरकारतर्फे साक्षीदार

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | लक्ष्मण सदाशिव चव्हाण | फिर्यादी |
| २. | सुनिता लक्ष्मण चव्हाण | साक्षीदार |
| ३. | कृष्णा लक्ष्मण चव्हाण | साक्षीदार |

ब. बचावपक्ष साक्षीदार – निरंक.

क. न्यायालयातर्फे साक्षीदार – निरंक.

सरकारतर्फे/बचावपक्षतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांकाची यादी.

अ. सरकारतर्फे –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र. ३७ | फिर्याद |
| २. | नि.क्र. ३८ | प्रथम खबर अहवाल |
| ३. | नि.क्र. ३९ | पुरवणी जवाब |
| ४. | नि.क्र. ४३ | वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ५. | नि.क्र. ४४ | वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ६. | नि.क्र. ४५ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

ब. बचावपक्षतर्फे – निरंक.

क. न्यायालयातर्फे – निरंक.

ड. भौतीक – वस्तु

| अ.क्र | भौतीक–वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

( दिनांक २५/०५/२०२६ रोजी पारीत )

आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम १८९ (२), १९१ (२), १९०, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की** :–

**२.** दि. ०१/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजेच्या सुमारास मौजे मंठा, ता. मंठा, जि. जालना येथील सरस्वती मंगल कार्यालय येथे लक्ष्मण सदाशिव चव्हाण (यापुढे 'फिर्यादी' असे संबोधण्यात येते.) हे परीवारासह त्यांच्या सुनेच्या परीवारासोबत तडजोड करण्याकरीत गेले असतांना फिर्यादीचा मुलगा याने फिर्यादीची सुन ज्या मुलासोबत बोलत होती त्या मुलाचा मोबाईल क्रमांक स्वतःच्या मोबाईलमध्ये काढून दाखवत असतांना आरोपी नंदकुमार राठोड, पिनु उर्फ माऊली जाधव यांनी आमच्या मुलीच्या चारीत्र्यावर संशय का घेता, असे म्हणून फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण

केली व फिर्यादीचा मुलगा कृष्णा यास कुंडलिक राठोड, संतोष राठोड, राजु राठोड, सुनिल राठोड प्रविण राठोड यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीची पत्नी सुनिता हिस उषा राठोड, किरण राठोड यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. वरील झटापटीत फिर्यादीच्या पत्नीच्या गळयातील मंगळसुत्र तुटुन पडले तसेच आरोपींनी फिर्यादीला, त्यांच्या मुलाला व पत्नीला शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. सदरील भांडण हे ईश्वर राठोड, भारत राठोड, वसंत राठोड यांनी सोडविले. अशा अशयाची फिर्यादीने पोलीस स्टेशन मंठा, ता. मंठा, जि. जालना येथे तक्रार दिली. त्यानंतर दि. ०३/१२/२०२४ रोजी फिर्यादीने पोलीस स्टेशन मंठा येथे पुरवणी जवाब दिला की, त्यांनी एका आरोपीचे नाव संतोष पंडीत राठोड असे सांगितले होते परंतु त्या आरोपीचे खरे नाव हे छम्या उर्फ संजय पंडीत राठोड असे आहे.

**३.** फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन, मंठा येथे अपराध क्र. ५९५/२०२४ नुसार आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंद केला. घटनेचा तपास पो.हे.कॉ./ब.नं.१६१ श्री. एस.जी. चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी याने घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच साक्षीदारांचे जवाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम १८९(२),

१९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** मी आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये नि.क्र. २२ वर दोषारोप निश्चीत केले. आरोपींची जबानी नि.क्र. २३ ते ३१ वर नोंदविण्यात आली. दोषारोपातील मजकुर आरोपींना मराठी भाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा **नाकबुल** करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. खटला चालवित असतांना आरोपींविरुध्द गुन्हया संदर्भात कोणतीही विधाने आली नसल्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**५.** मी निशाणी क्र. २२ वर निश्चित केलेले दोषारोपातील मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. ०१/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजेच्या सुमारास सरस्वती मंगल कार्यालय, मौजे मंठा, ता.मंठा, जि. जालना | |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादीस व साक्षीदारांना इजा पोहोचविण्याच्या हेतूने बेकायदेशीर मंडळी जमा केली आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय न्याय संहितेचे कलम १८९(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| २. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, बेकायदेशीर मंडळी जमवून दंगा केला आणि अशाप्रकारे त्यांनी आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय न्याय संहितेचे कलम १९१(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| ३. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादीला, त्यांच्या मुलाला व पत्नीला चापटा व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय न्याय संहितेचे कलम ११५(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| ४. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादीला, त्याच्या मुलाला व पत्नीला शिवीगाळ करुन अपमानीत केले आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय न्याय संहितेचे कलम ३५२ सह कलम १९० अन्वये | **.. नाही.** |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | गुन्हा केला, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |
| ५. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी फिर्यादीला, त्याच्या मुलाला व पत्नीला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय न्याय संहितेचे कलम ३५१(२) ३५१(३) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| ६. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## का र ण मि मां सा

६. प्रस्तुत खटल्यात आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. १ लक्ष्मण सदाशिव चव्हाण(फिर्यादी) यांची साक्ष नि.क्र. ३६ वर नोंदविली. अभियोग पक्षाची साक्षीदार क्र. २ सुनिता लक्ष्मण चव्हाण यांची साक्ष नि.क्र. ४६ वर नोंदविली, अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ कृष्णा लक्ष्मण चव्हाण यांची साक्ष नि.क्र. ४८ वर नोंदविली तसेच आरोपी व फिर्यादी यांच्यात आपसी समझोता झाल्याने तडजोडपत्र दाखल करण्यास परवानगी अर्ज व तडजोडपत्र अनुक्रमे निशाणी क्र. ३४ व ३५ वर दाखल केले आहे.

**<u>मुद्दे क्र.१ ते ५ करीता</u> :-**

७. प्रस्तुत प्रकरणातील मुद्दा क्रमांक १ ते ५ हे एकाच घटनेचा भाग असून त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी मुद्दा क्रमांक १ ते ५ हे एकत्रीतपणे विचारार्थ घेत आहे. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ लक्ष्मण सदाशिव चव्हाण हा फिर्यादी असून त्याने त्याच्या सरतपासादरम्यान असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखतो कारण ते त्याचे नातेवाईक आहे. ते दि. ०१/१२/२०२४ रोजी सरस्वती मंगल कार्यालय, मंठा येथे दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान आरोपीच्या मुलीच्या लग्नाच्या तडजोडीच्या बोलणीसाठी बसले असता आरोपी व त्यांच्यात बोलाचाली व किरकोळ शाब्दीक वाद झाला होता. या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे त्यांनी कथन केले. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, त्याने रागाच्या भरात पोलिस स्टेशन मंठा येथे तक्रार व पुरवणी जवाब दाखल केला होता. फिर्यादीला त्याने दिलेली फिर्याद, पुरवणी जवाब व प्रथम खबरी अहवाल दाखविला असता त्याने त्यावरील त्याची सही ओळखली. परंतु, त्यातील मजकुर त्याला माहित नसल्याचे कथन केले. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात देखील अभियोगपक्षास सहाय्य होईल असे काहीही या साक्षीदाराच्या साक्षीत आले नाही. प्रस्तुत साक्षीदाराने त्याच्या उलटतपासा दरम्यान बयाणामधील अधोरेखांकित भाग 'अ' हा पूर्णपणे नाकारला. तसेच सदर साक्षीदाराने हे मान्य केले की, आरोपींमध्ये व त्यांच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे त्यामुळे तडजोडपत्र अनुक्रमे निशाणी ३५ वर दाखल आहे.

८. अभियोग पक्षाची साक्षीदार क्र. २ सुनिता लक्ष्मण चव्हाण व साक्षीदार क्र. ३कृष्णा लक्ष्मण चव्हाण हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन

केले आहे की, ते आरोपींना ओळखतात कारण ते त्यांचे नातेवाईक आहेत. दि. ०१/१२/२०२४ रोजी ते सरस्वती मंगल कार्यालय मंठा येथे तडजोडीची बोलणी करण्यास गेले असता त्यांच्यात व आरोपींमध्ये शाब्दीक किरकोळ वादविवाद झाले होते. या व्यतिरीक्त काहीही घडलेले नव्हते. सदर दोन्ही साक्षीदारांचा अभियोग पक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला मात्र त्यादरम्यान देखील अभियोग पक्षास सहाय्यक ठरेल असे काहीही कथन या साक्षीदारांनी केलेले नाही. त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ पुर्णपुणे नाकारला आहे.

०९. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्यांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ जो की फिर्यादी व साक्षीदार क्र. २ व ३ जे की, घटनेचे प्रत्यक्षदर्शी व संबंधीत साक्षीदार असून त्यांच्या साक्षीवरुन विवादीत घटनेच्या वेळी आरोपी व त्यांच्यात किरकोळ शाब्दीक भांडणाव्यतिरीक्त काही घडले नसल्याचे कथन केले आहे. तसेच स्वतः फिर्यादीनेच त्याला, त्याच्या मुलाला व पत्नीला आरोपींनी मारहान केल्याचे व शिवगाळ करुन जिवेमारण्याच्या धमक्या दिल्याचे नाकारले आहे. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीस, त्यांच्या मुलाला व पत्नीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन मुक्कामार दिला, शिवीगाळ केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या अशा प्रकारचा सबळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध झाला नाही.

१०. पुरेशी संधी देवून देखील ईतर साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर उपलब्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे जरी आरोपींच्या विधिज्ञांनी जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी देखील त्या वैद्यकिय प्रमाणपत्रात नमुद जखमा हया आरोपींनी मारहाण केल्यामुळे झाल्यात या बाबत कोणताही पुरावा

अभिलेखावर नाही. त्यामूळे अभियोग पक्ष आरोपींविरुध्द लावण्यात आलेले आरोप निसंशयपणे सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ५ ला नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ६ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आ दे श

१. आरोपी क्र. **१) नंदकुमार देविदास राठोड,** आरोपी क्र. **२) कुंडलिक देविदास राठोड,** आरोपी क्र. **३) छम्या उर्फ संजय पंडीत राठोड,** आरोपी क्र.**४)राजेश ज्ञानेश्वर राठोड,** आरोपी क्र. **५) प्रविण ज्ञानेश्वर राठोड,** आरोपी क्र. **६) उषा नंदकुमार राठोड,** आरोपी क्र. **७) किरण पि. नंदकुमार राठोड उर्फ किरण भ्र. कृष्णा चव्हाण,** आरोपी क्र. ८) **पिनु उर्फ माऊली ज्ञानेश्वर प्रकाश जाधव,** आरोपी क्र. **९) सुनिल प्रल्हाद राठोड** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१ (१) अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत **प्रत्येकी रु.१५,०००/-** किंमतीचा वैयक्तीक जातमुचलका सादर करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.05.25 14:57:49 +0530

**( श्रीमती एल. पी. धन्वे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

दिनांक २५/०५/२०२६. मंठा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे – अक्षय ईश्वर देशपांडे
न्यायालयाचे नाव – दिवाणी न्यायालय (क.स्तर), मंठा
पिडीएफ दिनांक – २५/०५/२०२६

लघुलेखक